# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

## आजपर्यंत विद्यापीठांनी संयुक्त कृषि संशोधन व विकास समितीव्दारे संशोधन शिफारशी केलेले पिकनिहाय तंत्रज्ञान

| पीक व वाण | : | भेंडी |
|---|---|---|
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष – २००९** |
| लागवडीविषयी तंत्रज्ञान व शिफारशी | : | जांभ्या जमिनीत हिवाळयात भेंडी पिकापासून अधिक उत्पादन व नफा मिळविण्यासाठी पिकाची पेरणी पांढ-या पॉलीथीन कापडाच्या अच्छादनाचा वापर करुन डिसेंबरच्या दुस-या आठवडयात करावी व पिकास ७ ते ९ दिवसाच्या अंतराने एकूण १३ पाण्याच्या पाळया देऊन प्रत्येक पाळीच्या वेळी ५० मि.मि. पाणी द्यावे. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०१८** |
| पीक व्यवस्थापनाबद्दल इतर शिफारशी | : | उन्हाळी भेंडी पीकापासून अधिक उत्पादन व फायदेशीर मिळकतीसाठी कोकण विभागातील जांभ्या जमिनीत प्लास्टीक अस्तरीकरणाचा वापर आणि १२०-४५ × १५ सेमी अंतराने जोड ओळीत लागवड करून खालील प्रमाणे ठिबक सिंचनाद्वारे दररोज पाणी द्यावे व शिफारशीत मात्रेनुसार (१००:५०:५० किलो नत्र:स्फुरद:पालाश/हे) विद्राव्य खताचा आठवड्याच्या अंतराने सात समान हप्त्यात (०.३७५ किलो १९:१९:१९ आणि युरिया ०.१५५ किलो/हे) वापर करावा अशी शिफारस करण्यात येत आहे. |

| पीकाच्या वाढीचा कालावधी (आठवडा) | पाण्याची मात्रा (ली./मी लांबी) | एकूण दिलेले पाणी (मिमी/हे) |
|---|---|---|
| १ ते ५ | ५२ | ६५.४ |
| ६ ते ९ | ५० | ६२.८ |
| १० ते १३ | ७५ | ९४.२ |
| १४ ते १७ | ४७ | ५८.६ |